जावक क्रमांक 9088 /२०१८
चंदननगर पोस्टे पुणे शहर
दिनांक : १७/१०/२०१८

प्रति,

मा. जनसंपर्क अधिकारी सो.
पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर,
यांस सविनय सादर...

रिपोर्ट :- एल.ए.पठाण, पोलीस हवा.ब.नं.४५४९,
चंदननगर पो स्टेशन, पुणे शहर
याजकडुन विनंती पुर्वक

**विषय - सर्व वर्तमानपत्रात प्रसिध्दी होणेबाबत**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर की, चंदननगर पो.ठाणे मनुष्य मिसींग रजि. नंबर ११९/१८ मधील खबर देणार शेखर अवस्थी सन ऑफ जगदीश अवस्थी वय ३६ वर्ष धंदा नोकरी रा. पिटटी कोर्टयार्ड,जुना मुढंवा रोड, चंदननननगर पोलीस स्टेशनचे बाजुला, चंदननगर,पुणे यांनी त्यांचे वडील नामे जगदीश अवस्थी सन ऑफ रामकष्ण अवस्थी वय ६६ वर्ष रा. सदर हे दिनांक १४/१०/२०१८ रोजी सायंकाळी ०५/३० वा. ते रात्रौ ०९/०० वा. चे दरम्यान पिटटी कोर्टयार्ड,जुना मुढंवा रोड, चंदननननगर पोलीस स्टेशनचे बाजुला, चंदननगर,पुणे येथील राहते घरातुन कोणास काही न सांगता कोठेतरी निघुन गेले बाबत मिसींग तक्रार दिल्याने ती वरील प्रमाणे नोंद आहे. यातील मिसींग इसमाचे वर्णन खालील प्रमाणे,

नाव जगदीश अवस्थी सन ऑफ रामकष्ण अवस्थी वय ६६ वर्ष, रंगाने सावळे, उंची ५ फुट ६ इंच, डोकीचे केस बारीक व पांढरे, मिशा बारीक व पांढ-या, नाक सरळ, अंगात ग्रे रंगाचा टी शर्ट व निळया रंगाची ट्रॅक पॅन्ट, डावे हाताचे मनगटाचे मागील बाजुस जुने ऑप्रेशची निशाणी, डावे पायाचे घोटयाजवळ जुन्या जखमेचा व्रण व त्या पायाचा अंगठा नाही, शिक्षण एमकॉम, हिंदी भाषा बोलतात,जवळ कॅरीबॅग त्या मध्ये एक जोड वापरती कपडे, जवळ एलजी कंपनीचा मोबाईल त्यामध्ये ९६५१९६२८४७/९४५३६६४१५९ या नंबरचे सिमकार्ड,

तरी यातील मिसींग इसमाचे तपासकामी सर्व वर्तमानपत्रात प्रसिध्दी होणेस विनंती आहे

